Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

A

Paper-II
PHILOSOPHY

Signature and Name of Invigilator

1. (Signature) .....

(Name) .....

2. (Signature) .....

(Name) .....

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. .....

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

JUN - 12220

Time Allowed : 2 Hours] **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **40**

Number of Questions in this Booklet : **100**

Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   Example : where (C) is the correct response.

   (A) (B) ● (D)

5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   उदा. : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.

   (A) (B) ● (D)

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

Philosophy
Paper II
दर्शनशास्त्र
प्रश्नपत्रिका II

Time Allowed : 120 Minutes] **[Maximum Marks : 200**

Note : This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

सूचना : या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Given below are two statements labelled Assertion (A) and Reason (R). Examine both with respect to the Yoga system and select the *correct* code :

Assertion (A) :

Pratyāhāra is the control of the senses and consists in withdrawing senses from internal objects.

Reason (R) :

Our senses must be checked and directed towards inner goal.

Codes :

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true and (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true and (R) is false

(D) (A) is false and (R) is true

1. पुढे अवधारणा (A) आणि कारण (R) अशी दोन विधाने दिली आहेत. त्यांचे योगदर्शनाच्या संदर्भात परीक्षण करून अचूक संकेतांक निवडा :

अवधारणा (A) :

प्रत्याहार म्हणजे इंद्रियांचे नियमन, प्रत्याहारात इंद्रियांना त्यांच्या आंतरिक विषयांपासून परावृत्त केले जाते.

कारण (R) :

आपल्या इंद्रियांवर नियंत्रण ठेवले पाहिजे आणि त्यांच्या आंतरिक उद्दिष्टांकडे प्रवृत्त केले पाहिजे.

संकेतांक :

(A) (A) आणि (R) दोन्हीही सत्य असून (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) दोन्हीही सत्य असून (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) सत्य आणि (R) असत्य आहे

(D) (A) असत्य आणि (R) सत्य आहे

2. Which one of the following statements is *true* with regard to theory of causation of Vedānta ?

(A) Vivartavāda is compatible with ārambhavāda

(B) Vivartavāda is incompatible with satkāryavāda

(C) Satkāryavāda is incompatible with parināmavāda

(D) Vivartavāda is compatible with satkāryavāda

3. Match List I with List II in the context of the Jaina theory of knowledge and mark the *correct* code :

List I

(*i*) Matijñāna

(*ii*) Avadhi

(*iii*) Manah-paryāya

(*iv*) Kevala-jñāna

List II

(*a*) omniscience

(*b*) thought-reading

(*c*) supernatural cognition

(*d*) ordinary cognition

Codes :

	(*i*)	(*ii*)	(*iii*)	(*iv*)
(A)	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(B)	(*d*)	(*c*)	(*b*)	(*a*)
(C)	(*c*)	(*a*)	(*b*)	(*d*)
(D)	(*b*)	(*a*)	(*c*)	(*d*)

2. वेदान्ताच्या कार्यकारण उपपत्तीच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान **सत्य** आहे ?

(A) विवर्तवाद आरंभवादाशी अनुरूप आहे

(B) विवर्तवाद सत्कार्यवादाशी अनुरूप नाही

(C) सत्कार्यवाद हा परिणामवादाशी अनुरूप नाही

(D) विवर्तवाद हा सत्कार्यवादाशी अनुरूप आहे

3. सूची I आणि सूची II च्या जैनांच्या ज्ञानाच्या उपपत्तीच्या संदर्भात जोड्या लावा आणि अचूक संकेतांक निवडा :

सूची I

(*i*) मतिज्ञान

(*ii*) अवधी

(*iii*) मन:पर्याय

(*iv*) केवलज्ञान

सूची II

(*a*) सर्वज्ञता

(*b*) विचारांचे ज्ञान

(*c*) अतिंद्रीय ज्ञान

(*d*) लौकिक ज्ञान

संकेतांक :

	(*i*)	(*ii*)	(*iii*)	(*iv*)
(A)	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(B)	(*d*)	(*c*)	(*b*)	(*a*)
(C)	(*c*)	(*a*)	(*b*)	(*d*)
(D)	(*b*)	(*a*)	(*c*)	(*d*)

4. Match List I with List II in the context of the Vedas and mark the *correct* code :

List I

(*i*) Mantra

(*ii*) Brāhmana

(*iii*) Āranyaka

(*iv*) Upanishad

List II

(*a*) intensely philosophical and spiritual

(*b*) hymns addressed to the Gods and Goddesses

(*c*) collection of rules and regulations of rituals

(*d*) transition from ritualistic to philosophical

Codes :

	(*i*)	(*ii*)	(*iii*)	(*iv*)
(A)	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(B)	(*d*)	(*c*)	(*b*)	(*a*)
(C)	(*c*)	(*a*)	(*b*)	(*d*)
(D)	(*b*)	(*c*)	(*d*)	(*a*)

5. The *Manas* is that substance which is independent and is atomic in size. This view is held by :

(A) Nyāya-Vaiśeṣika

(B) Cārvāka

(C) Advaita Vedānta

(D) Mīmāmsā

4. सूची I आणि सूची II यांच्या जोड्या वेद संदर्भात जुळवा आणि **अचूक** संकेतांक निवडा :

सूची I

(*i*) मंत्र

(*ii*) ब्राह्मण

(*iii*) आरण्यक

(*iv*) उपनिषद

सूची II

(*a*) तत्त्वज्ञान आणि अध्यात्मिकतेने ओतप्रोत भरलेले

(*b*) देव व देवतांना उद्देशून असलेली स्तोत्रे

(*c*) कर्मकांडासंबंधी नियामक तत्त्वे

(*d*) कर्मकांडाकडून तत्त्वज्ञानाकडे संक्रमण

संकेतांक :

	(*i*)	(*ii*)	(*iii*)	(*iv*)
(A)	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(B)	(*d*)	(*c*)	(*b*)	(*a*)
(C)	(*c*)	(*a*)	(*b*)	(*d*)
(D)	(*b*)	(*c*)	(*d*)	(*a*)

5. "**मनस्** हे एक द्रव्य असून ते अणु परिमाणी आहे." हे मत आहे :

(A) न्याय-वैशेषिकांचे

(B) चार्वाकांचे

(C) अद्वैत वेदान्तांचे

(D) मीमांसेचे

6. Examine the following statement and choose the fallacy immanent in it :

"Fire is cold because it is a substance."

(A) Bādhita

(B) Virūdha

(C) Satpratipaksha

(D) Savyabhichāra

7. Which one of the following is the causal potency that propels the man to perform the actions enjoined by the Veda ?

(A) Arthavāda

(B) Bhāvanā

(C) Niṣedha

(D) Vidhi

8. Which one of the following is *not* a part of the triple path prescribed by the Buddhism ?

(A) Prajñā

(B) Jñāna

(C) Śīla

(D) Samādhi

6. पुढील विधान तपासा आणि त्यात झालेला हेत्वाभास ओळखा :

"अग्नी शीतल आहे, कारण तो द्रव्य आहे."

(A) बाधित

(B) विरुद्ध

(C) सत्प्रतिपक्ष

(D) सव्यभिचार

7. मनुष्याने वेदप्रणीत कृती कराव्यात अशी प्रेरणा त्याला मिळण्यासाठी पुढीलपैकी कोणती गोष्ट कारणीभूत ठरते ?

(A) अर्थवाद

(B) भावना

(C) निषिद्ध

(D) विधी

8. पुढीलपैकी कोणते बौद्धांनी प्रतिपादन केलेल्या त्रिपदरी मार्गाचा भाग **नाही** ?

(A) प्रज्ञा

(B) ज्ञान

(C) शील

(D) समाधी

9. Which one of the following combinations of theory of error and its advocator is *wrongly* matched ?

(A) Satkhyāti — Rāmānuja

(B) Anirvachaniya Khyāti — Shankara

(C) Anyathākhyāti — Prabhākara

(D) Asatkhyāti — Mādhyamika Buddhism

10. Consider the following statements as per the theory of Satkāryavāda upheld by Sāmkhya and mark the *correct* code :

(*i*) The full-grown oak tree is contained in its seed.

(*ii*) The curd is contained in the milk in an un-manifest form.

(*iii*) The paper is a new production, something that is not contained in the pulp-wood.

Codes :

(A) Only (*i*) is true

(B) Only (*i*) and (*ii*) are true

(C) Only (*iii*) is true

(D) Only (*i*) and (*iii*) are true

9. ख्यातिवादासंबंधी उपपत्ती आणि त्यांचे पुरस्कर्ते यांच्या जोड्या पुढे दिलेल्या आहेत. त्यापैकी कोणती एक जोडी **चुकीची** आहे ?

(A) सत्ख्याती – रामानुज

(B) अनिर्वचनीय ख्याती – शंकर

(C) अन्यथाख्याती – प्रभाकर

(D) असत्ख्याती – माध्यमिक बौद्ध

10. सांख्यांच्या सत्कार्यवादाच्या संदर्भात पुढील विधाने तपासा आणि अचूक संकेतांक निवडा :

(*i*) पूर्ण वाढलेला ओक वृक्ष त्याच्या बीजामध्ये सामावलेला होता.

(*ii*) दही दुधामध्ये अव्यक्त स्वरूपात सामावलेले आहे.

(*iii*) कागद ही नवी निर्मिती आहे, तो कागदाच्या लगद्यात सामावलेला नाही.

संकेतांक :

(A) फक्त (*i*) च सत्य आहे

(B) फक्त (*i*) आणि (*ii*) च सत्य आहेत

(C) फक्त (*iii*) च सत्य आहे

(D) फक्त (*i*) आणि (*iii*) च सत्य आहेत

11. Sartre's notion of freedom negotiates between :

(A) facticity and responsibility

(B) facticity and nihilism

(C) facticity and indeterminism

(D) facticity and immanence

12. Anaximander's fundamental stuff is ..... .

(1) Formless

(2) Partless

(3) Infinite

(4) Eternal

Codes :

(A) (1) and (2)

(B) (1), (2) and (3)

(C) (2), (3) and (4)

(D) (1), (2), (3) and (4)

11. सार्त्रची स्वातंत्र्याची कल्पना पुढीलपैकी कशामध्ये वाटाघाटी करते ?

(A) परिस्थिती व उत्तरदायित्व

(B) परिस्थिती व शून्यवाद

(C) परिस्थिती व अनिश्चितता

(D) परिस्थिती व अंतर्भूतता

12. ॲनॅक्झिमँडरच्या मते मूलद्रव्य हे ..... आहे.

(1) आकाररहित

(2) विभागरहित

(3) अमर्यादित

(4) नित्य

संकेतांक :

(A) (1) आणि (2)

(B) (1), (2) आणि (3)

(C) (2), (3) आणि (4)

(D) (1), (2), (3) आणि (4)

13. Given below are two statements labelled as Assertion (A) and Reason (R) and select the *correct* code :

Assertion (A) :

The Sophists denied the possibility of scientific knowledge.

Reason (R) :

The Sophists had maintained that knowledge is perception and perception is relative and transitory.

Codes :

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

14. In his 'Republic' Plato introduces the tripartition of the soul to address :

(A) Individual conflict

(B) Political conflict

(C) Educational conflict

(D) Psychological conflict

13. पुढे अवधारणा (A) आणि कारण (R) अशी दोन विधाने दिली आहेत आणि अचूक संकेतांक निवडा :

अवधारणा (A) :

सोफिस्टांनी वैज्ञानिक ज्ञानाची शक्यता नाकारली.

कारण (R) :

सोफिस्टांच्या मते प्रत्यक्षानेच ज्ञान होते आणि प्रत्यक्ष हे सापेक्ष आणि परिवर्तशील असते.

संकेतांक :

(A) (A) आणि (R) दोन्हीही सत्य आहेत आणि (R) हे (A) चे यथार्थ स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) दोन्हीही सत्य आहेत पण (R) हे (A) चे यथार्थ स्पष्टीकरण नाही

(C) (A) सत्य आणि (R) असत्य आहेत

(D) (A) असत्य आणि (R) सत्य आहेत

14. प्लेटोने त्याच्या 'रिपब्लीक' ग्रंथामध्ये आत्म्याची केलेली त्रिवर्गीय विभागणी ..... निर्देशित करते.

(A) व्यक्तिगत संघर्ष

(B) राजकीय संघर्ष

(C) शैक्षणिक संघर्ष

(D) मानसशास्त्रीय संघर्ष

15. Aristotle upholds that the formal, efficient and final causes are :

(A) neither identical nor different

(B) both identical and different

(C) identical

(D) different

16. According to Kant, the idea of God and immortality are :

(A) Innate ideas

(B) Objects of intuition

(C) Ideas of reason

(D) Ideas of imagination

17. Which of the following books is *not* authored by Rene Descartes ?

(A) Discourse on Method

(B) Meditation on First Philosophy

(C) Principles of Philosophy

(D) An Essay Concerning Human Understanding

18. Which of the following philosophers infers the self-existence based upon thinking ?

(A) Immanuel Kant

(B) John Locke

(C) Jean-Paul Sartre

(D) Rene Descartes

15. ॲरिस्टॉटलच्या मतानुसार आकारिक, निमित्त आणि अंतिम कारण ..... आहेत.

(A) समानही नाहीत आणि भिन्नही नाहीत

(B) समान आणि भिन्न दोन्ही

(C) समान

(D) भिन्न

16. कांटच्या मते ईश्वर कल्पना आणि अमर्त्यत्त्व हे ..... आहे.

(A) आंतरिक कल्पना

(B) आंत:प्रज्ञेचे विषय

(C) तर्काची कल्पना

(D) कल्पनेची कल्पना

17. खालीलपैकी कोणता ग्रंथ रेने देकार्टने लिहिलेला **नाही** ?

(A) डीस्कोर्स ऑन मेथड

(B) मेडिटेशन ऑन फर्स्ट फिलॉसॉफी

(C) प्रिन्सीपल्स ऑफ फिलॉसॉफी

(D) ॲन एसे कन्सर्नींग ह्यूमन अंडरस्टँडींग

18. स्वत:चे अस्तित्व विचार करण्यावर आधारित असते असे अनुमान खालीलपैकी कोणता तत्त्वज्ञ काढतो ?

(A) इमॅन्युअल कांट

(B) जॉन लॉक

(C) जाँ-पॉल सार्त्र

(D) रेने डेकार्ट

19. Who advocates that clarity and distinctness are the qualities of knowledge ?

(A) Plato

(B) Aristotle

(C) Rene Descartes

(D) David Hume

20. Who said, 'mind is the idea of body' ?

(A) John Locke

(B) Spinoza

(C) Rene Descartes

(D) Plato

21. Who is the author of 'Letters Concerning Toleration' ?

(A) John Locke

(B) Hobbes

(C) David Hume

(D) Leibniz

22. "Tattvamasi", according to Madhva, means :

(A) Tasya tvam asi

(B) Tasmin tvam asi

(C) Tena tvam asi

(D) Tasmat tvam asi

19. स्पष्टता आणि विविक्तता हे ज्ञानाचे गुणधर्म आहेत असे कोण सांगते ?

(A) प्लेटो

(B) ॲरिस्टॉटल

(C) रेने डेकार्टस

(D) डेव्हीड ह्युम

20. मन म्हणजे शरीराची कल्पना असते, असे कोण म्हणते ?

(A) जॉन लॉक

(B) स्पिनोझा

(C) रेने डेकार्ट

(D) प्लेटो

21. 'लेटर कन्सर्नींग टॉलरेशन' ह्या ग्रंथाचा लेखक कोण आहे ?

(A) जॉन लॉक

(B) हॉब्ज

(C) डेव्हीड ह्युम

(D) लायब्नीझ

22. मध्वाचार्यांच्या मते, 'तत्त्वमसि' म्हणजे :

(A) तस्य त्वम् असि

(B) तस्मिन् त्वम् असि

(C) तेन त्वम् असि

(D) तस्मात् त्वम् असि

23. Match the pairs :

Group I

(*a*) Āsrava

(*b*) Saṁvara

(*c*) Vrata

(*d*) Law of Karma

Group II

(*i*) Arrest of flux of karma and matter into soul

(*ii*) Moral justification of suffering

(*iii*) Karma entering into soul

(*iv*) A means to saṁvara

Codes :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(*iii*)	(*iv*)	(*i*)	(*ii*)
(B)	(*iii*)	(*iv*)	(*ii*)	(*i*)
(C)	(*iv*)	(*ii*)	(*iii*)	(*i*)
(D)	(*iii*)	(*i*)	(*iv*)	(*ii*)

24. Which of the following is a feature of Sthitaprajña mentioned in Bhagvad Gita ?

(A) Sam Dukhe Same Krutvā

(B) Tat tvam asi

(C) Aham Brahmasmi

(D) Dhārayati iti Dharmah

23. जोड्या जुळवा :

गट I

(*a*) आस्रव

(*b*) संवर

(*c*) व्रत

(*d*) कर्मसिद्धांत

गट II

(*i*) कर्म जडाचा आत्म्यात शिरणारा ओघ थांबविणे

(*ii*) दु:खाचे नैतिक समर्थन

(*iii*) कर्माचा आत्म्यातील शिरकाव

(*iv*) संवरसाधन

संकेतांक :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(*iii*)	(*iv*)	(*i*)	(*ii*)
(B)	(*iii*)	(*iv*)	(*ii*)	(*i*)
(C)	(*iv*)	(*ii*)	(*iii*)	(*i*)
(D)	(*iii*)	(*i*)	(*iv*)	(*ii*)

24. खालीलपैकी कोणते स्थितप्रज्ञाचे लक्षण भगवद्गीतेमध्ये सांगितलेले आहे ?

(A) समदु:खे समे कृत्वा

(B) तत् त्वं असि

(C) अहं ब्रह्मास्मी

(D) धारयति इति धर्म:

25. Select the *correct* alternative which postulates for the moral intelligibility of the universe :

(A) Karma and Dharma

(B) Law of Karma and Rebirth

(C) Aṣṭānga-mārga

(D) Aṣṭāṅgika-mārga

26. Dharma does not mean :

(A) Attributes

(B) Constituents of reality

(C) Detachment

(D) Duties, Virtue, Merit

27. According to the Sāṁkhyas, Dharma signifies a specific function of the :

(A) Mind

(B) Ego

(C) Intellect

(D) Mahat

25. खालीलपैकी कोणता पर्याय जगाच्या नैतिक आकलनाची गृहीतके देतो ?

(A) कर्म व धर्म

(B) कर्मसिद्धांत व पुनर्जन्म

(C) अष्टांगमार्ग

(D) अष्टांगिकमार्ग

26. धर्म म्हणजे ..... नव्हे.

(A) गुणधर्म

(B) वास्तवघटक

(C) वैराग्य

(D) कर्तव्ये, सद्गुण, पुण्य

27. सांख्यांच्या मते, धर्म कशाची वृत्ती होय ?

(A) मनस्

(B) अहंकार

(C) बुद्धी

(D) महत

28. Tilak insists that Sthitaprajña should :

(A) Renounce the world

(B) Work in the world

(C) Work in renunciation

(D) Work renouncing the attachment to the fruits of actions

29. While interpreting Bhagavad-gītā, the concept of 'Niṣkāma-karma' is underlined by :

(A) Tilak

(B) Madhva

(C) Madhva and Tilak

(D) Neither Madhva nor Tilak

30. Which of the following does *not* fit with Moore's defence of common sense ?

(A) 'In this universe there are many material objects.'

(B) 'Men perform acts of consciousness.'

(C) We know the objects and acts of consciousness.

(D) There are evidences for our belief regarding external world.

28. स्थितप्रज्ञाने काय केले पाहिजे, असा टिळकांचा कोणता आग्रह आहे ?

(A) जग सोडले पाहिजे

(B) जगात राहून कार्य केले पाहिजे

(C) संन्यासात कर्मरत राहिले पाहिजे

(D) कर्मफलासक्ती सोडून कार्यरत राहिले पाहिजे

29. भगवद्गीतेचा अन्वयार्थ लावताना 'निष्काम कर्म' ही संकल्पना कोणी अधोरेखित केली ?

(A) टिळक

(B) मध्व

(C) मध्व व टिळक

(D) मध्व नव्हे नी टिळकही नव्हे

30. मूरच्या धादान्त मताच्या समर्थनात पुढीलपैकी कोणते विधान जुळत **नाही** ?

(A) 'या विश्वात अनेक भौतिक वस्तू आहेत.'

(B) मानव जाणीवयुक्त कृती करतात.

(C) आपल्याला वस्तू व जाणीवयुक्त कृतींचे ज्ञान होते.

(D) आपल्या बाह्यजगाविषयीच्या धारणांसाठी पुरावे आहेत.

31. Cross the odd one out keeping in mind Jaina Ethics :

(A) Jīva, Ajīva, Āsrava

(B) Āsrava, Bandha, Saṁvara

(C) Saṁvara, Nirjara, Mokṣa

(D) Kamma, Kusala Kamma, Akusala Kamma

32. "Sthitaprajña" is described in the Gītā as one who controls the senses like a :

(A) Lion

(B) Tortoise

(C) Snake

(D) Crow

33. Hedonistic calculus is proposed by :

(A) J.S. Mill

(B) Bentham

(C) Sidgwick

(D) Kant

31. जैन नीतिशास्त्र संदर्भात, संगत नसणारा पर्याय निवडा :

(A) जीव, अजीव, आस्रव

(B) आस्रव, बंध, संवर

(C) संवर, निर्जर, मोक्ष

(D) कम्म, कुसल-कम्म, अकुसल-कम्म

32. गीतेमध्ये स्थितप्रज्ञाचे वर्णन करताना तो कोणाप्रमाणे इंद्रियनिग्रह करतो, असे म्हटले आहे ?

(A) सिंह

(B) कासव

(C) सर्प

(D) कावळा

33. सुखवादी कलन कोणी सांगितले आहे ?

(A) जे.एस. मिल

(B) बेंथॅम

(C) सिज्वीक

(D) कांट

34. "Ethical sentences are primarily emotion expressions of one's own attitudes and are intended to influence the actions of the listeners" — can be attributed to which one of the following philosophers ?

(A) Bentham

(B) Sidgwick

(C) A.J. Ayer

(D) Kant

35. Which one of the following theories of punishment views crime in terms of its contributing conditions and argues for the changing these conditions that punishing the offender ?

(A) Deterrent theory

(B) Retributive theory

(C) Preventive theory

(D) Reformative theory

34. "नैतिक विधाने स्वत:च्या मन:प्रवृतीच्या भावनांची अभिव्यक्ती असते तसेच ते ऐकणाऱ्यांच्या कृतीला प्रभावित करण्याच्या उद्देशाने केलेले असतात." हे विधान खालीलपैकी कोणत्या तत्त्वज्ञान्याशी संबंधित आहे ?

(A) बेंथॅम

(B) सिज्वीक

(C) ए.जे. एयर

(D) कांट

35. खालीलपैकी शिक्षेची कोणती उपपत्ती परिस्थीतीवर गुन्ह्याया अर्थ लावते आणि शिक्षा देण्याऐवजी गुन्हेगारासाठी परिस्थिती बदलण्यावर भर देते ?

(A) प्रतिबंधात्मक उपपत्ती

(B) प्रतिशोध उपपत्ती

(C) बचावात्मक उपपत्ती

(D) सुधारणात्मक उपपत्ती

36. Which of the following best summarizes Kant's possible criticism of Egoism as a theory of Ethics ?

(A) Ethical egoism is logically self-contradictory

(B) Egoism involves conflict of will

(C) Egoism involves wrong view of human nature

(D) One cannot will the egoistic maxim to be a universalized

37. Match the pairs :

Group I

(*a*) Good

(*b*) Right

(*c*) Duty

(*d*) Virtue

Group II

(*i*) Simple, unanalyzable

(*ii*) Obligatoriness

(*iii*) Nobility

(*iv*) Appropriateness

Codes :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(*iii*)	(*ii*)	(*iv*)	(*i*)
(B)	(*iii*)	(*i*)	(*ii*)	(*iv*)
(C)	(*iii*)	(*iv*)	(*i*)	(*ii*)
(D)	(*i*)	(*iv*)	(*ii*)	(*iii*)

36. एक नीतिशास्त्रीय उपपत्ती म्हणून कांटची स्वार्थवादावरील संभाव्य समीक्षा खालीलपैकी कोणत्या पर्यायात सारांशरूपाने मांडली आहे ?

(A) नैतिक स्वार्थवाद हा तर्कत: आत्मविसंगत आहे

(B) स्वार्थवादात ईहासंघर्ष अंतर्भूत असतो

(C) स्वार्थवाद मानवी स्वभावाविषयक चुकीचा दृष्टिकोण राखतो

(D) स्वार्थी नियमतत्त्व सार्वत्रिक व्हावे, अशी इच्छा राखता येत नाही

37. जोड्या जुळवा :

गट I

(*a*) चांगले

(*b*) योग्य

(*c*) कर्तव्य

(*d*) सद्‌गुण

गट II

(*i*) निरवयवी, अविश्लेषणीय

(*ii*) तव्यता

(*iii*) उदात्तता

(*iv*) औचित्य

संकेतांक :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(*iii*)	(*ii*)	(*iv*)	(*i*)
(B)	(*iii*)	(*i*)	(*ii*)	(*iv*)
(C)	(*iii*)	(*iv*)	(*i*)	(*ii*)
(D)	(*i*)	(*iv*)	(*ii*)	(*iii*)

38. Match the pairs :

Group I

(*a*) Golden rule

(*b*) Golden mean

(*c*) Categorical imperative

(*d*) Hypothetical imperative

Group II

(*i*) Conditional

(*ii*) Reciprocity

(*iii*) Avoiding extremes

(*iv*) Unconditional

Codes :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(*i*)	(*iv*)	(*iii*)	(*ii*)
(B)	(*i*)	(*iv*)	(*ii*)	(*iii*)
(C)	(*ii*)	(*iii*)	(*iv*)	(*i*)
(D)	(*iii*)	(*i*)	(*iv*)	(*ii*)

39. The primacy of character over action is asserted in :

(A) Traditional ethics

(B) Meta-ethics

(C) Ethics of care

(D) Virtue-ethics

38. जोड्या जुळवा :

गट I

(*a*) सोनेरी नियम

(*b*) सोनेरी मध्य

(*c*) निश्चयात्मक आज्ञार्थक

(*d*) गृहीत आज्ञार्थक

गट II

(*i*) प्रतिबंधात्मक

(*ii*) परस्परभाव

(*iii*) पराकाष्ठा टाळणे

(*iv*) अप्रतिबंधात्मक

संकेतांक :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(*i*)	(*iv*)	(*iii*)	(*ii*)
(B)	(*i*)	(*iv*)	(*ii*)	(*iii*)
(C)	(*ii*)	(*iii*)	(*iv*)	(*i*)
(D)	(*iii*)	(*i*)	(*iv*)	(*ii*)

39. क्रियेपेक्षा चारित्र्याची प्राथमिकता कोण प्रतिपादित करते ?

(A) पारंपरिक नीतिशास्त्र

(B) अधिनीतिशास्त्र

(C) निगेचे नीतिशास्त्र

(D) सद्‌गुण नीतिशास्त्र

40. Which among the following is a *true* statement with regard to Egoism as an ethical theory ?

(A) Ethical egoism presupposes psychological egoism

(B) Ethical egoism does not presuppose psychological egoism

(C) Psychological egoism is identical with psychological hedonism

(D) Psychological egoism and psychological hedonism are two contradictory positions

41. Which of the following statements is *not true* of Act-deontological theory of Ethics ?

(A) Particular judgements are basic and any general rules are to be derived from them, not the other way around.

(B) It presents a method determining what is right by becoming clear about facts in the case and then forming a judgement about action.

(C) We cannot form a thumb of rule judgement without taking stock of concrete situation.

(D) Act-deontology is a position that implicitly assumes hedonism.

40. स्वार्थवाद या नैतिक उपपत्तीबाबत खालीलपैकी कोणते विधान **सत्य** आहे ?

(A) नैतिक स्वार्थवाद मानसशास्त्रीय स्वार्थवादाला गृहीत धरतो.

(B) नैतिक स्वार्थवाद मानसशास्त्रीय स्वार्थवादाला गृहीत धरत नाही.

(C) मानसशास्त्रीय स्वार्थवाद हा मानसशास्त्रीय सुखवाद होय.

(D) मानसशास्त्रीय स्वार्थवाद व मानसशास्त्रीय सुखवाद ह्या दोन परस्परविरुद्ध भूमिका होत.

41. नीतिशास्त्राच्या कृती-तव्यवादीसिद्धांताबाबत खालीलपैकी कोणते विधान सत्य **नाही** ?

(A) विशिष्ट विधाने पायाभूत असतात व कोणतेही सामान्य नियम त्यांपासून निष्कर्षित केले जातात, विरुद्ध रीतीने नव्हे.

(B) काय योग्य आहे याची सुस्पष्ट जाणीव बाळगून जे योग्य ते ठरविण्याची व नंतर त्याप्रमाणे कृतीविषयी अवधारण निर्धारणाची पद्धती देते.

(C) प्रत्यक्ष स्थितीचा विचार न करता ठोकताळ्याने अवधारण करता येत नाही.

(D) कृती-तव्यवादी भूमिका अंतस्थ रीतीने सुखवाद गृहीत धरते.

42. Happiness is construed by Hedonistic egoism as :

(A) Maximisation of pleasure and minimization of pain

(B) Bliss

(C) Maximization of one's own pleasure

(D) Maximization of pleasure of maximum number of people

43. For Vivekananda, Religion is :

(A) Being and Becoming

(B) Hearing

(C) Acknowledging

(D) Listening

44. Saṁkara's Māyāvāda is criticized on seven grounds by :

(A) Rāmānuja

(B) Vallabha

(C) Madhva

(D) Nimbarka

42. व्यक्तित्त्ववादी सुखवाद सुखाची संकल्पना स्पष्ट करतात :

(A) सुखाची अधिकतमता व दु:खाची पातळी कमी करणे

(B) परमानंद

(C) आपल्या स्वत:चा सुखाची अधिकतमता

(D) अधिकतम जनांच्या सुखाची अधिकतमता

43. विवेकानंदांच्या मते, धर्म म्हणजे :

(A) असणे व होणे

(B) ऐकणे

(C) स्वीकृती देणे

(D) लक्षपूर्वक ऐकणे

44. शंकराचार्यांच्या मायावादावर सात आक्षेप घेणारे कोण ?

(A) रामानुज

(B) वल्लभ

(C) मध्व

(D) निंबार्क

45. Saccidānanda is the ..... of Brahman.

(A) Description

(B) Main feature

(C) Negative characterization

(D) Essential nature

46. Which of the following is *not* maintained by Śaṁkara ?

(A) Prātibhāsika

(B) Anekāntika

(C) Vyāvahārika

(D) Pāramārthika

47. According to Rāmānuja , the world-process is the outcome of :

(A) Pancīkaraṇa

(B) Trivṛtkaraṇa

(C) Apṛthaksiddhi

(D) Brahman

45. सच्चिदानंद हे ब्रह्माचे :

(A) वर्णन

(B) प्रमुख वैशिष्ट्य

(C) नकारात्मक वर्णन

(D) सारभूत स्वरूप

46. शंकराचार्यांनी कोणता (पर्याय) मानला **नाही** ?

(A) प्रातिभासिक

(B) अनेकांतिक

(C) व्यावहारिक

(D) पारमार्थिक

47. रामानुजाचार्यांच्या मते, जगप्रक्रिया कशाचा परिपाक आहे ?

(A) पंचीकरण

(B) त्रिवृत्करण

(C) अपृथक्सिद्धी

(D) ब्रह्म

48. Who among the following thinkers speaks of possibility of the consciousness of the denial of 'I' ?

(A) K.C. Bhattacharyya

(B) Vivekananda

(C) Sri Aurobindo

(D) Radhakrishnan

49. Which of the following is *not* true of Iqbal's conception of God ?

(A) God is immanent

(B) God is transcendent

(C) Constantly creative and dynamic

(D) God is irrelational

50. In Sri Aurobindo's philosophy "that state of common self-existence in which the knower and the known are one through knowledge" refers to which of the following ?

(A) Reason

(B) Intuition

(C) Intentionality of consciousness

(D) Supraintentional consciousness

48. खालीलपैकी कोणता तत्त्वज्ञ आत्मनिषेधात्मक जाणिवेची शक्यता मांडतो ?

(A) के.सी. भट्टाचार्य

(B) विवेकानंद

(C) श्री अरविंद

(D) राधाकृष्णन

49. खालीलपैकी कोणता (पर्याय) इक्बालच्या ईश्वरसंकल्पनेबाबत खरा **नाही** ?

(A) ईश्वर अंतर्यामी आहे

(B) ईश्वर इंद्रियातीत आहे

(C) सतत सृजनशील व सक्रिय आहे

(D) ईश्वर नातेरहित आहे

50. श्री अरविंदांच्या तत्त्वज्ञानातील "ज्ञाता व ज्ञेय यांची एकरूपता ज्ञानाने साधल्या जाणाऱ्या सामायिक स्वस्ती अवस्थेचा" संदर्भ कशाशी असतो ?

(A) बुद्धी

(B) अंत:प्रज्ञा

(C) जाणिवेची सहेतुकता

(D) सहेतुकातीत जाणीव

51. "This human body is the greatest body in the universe, and a human being the greatest being" is said by :

(A) Radhakrishnan

(B) Sri Aurobindo

(C) Tagore

(D) Swami Vivekananda

52. In 'Republic' of Plato which of the following is *not* a reason why philosophers should rule a city ?

(A) They hate poetry

(B) They hate falsehood

(C) They love what is rather than what becomes

(D) They are quick learners

53. In Moore's critique of Hegelian Idealism, the main tenet under attack is :

(A) "All relations are internal to their terms."

(B) "All relations are external to their terms."

(C) "Relations are both internal and external."

(D) "There is no distinction between internal and external relations."

51. "हा मानवी देह जगातील सर्वात महान देह होय व माणूस सर्वात महान जीव" हे विधान कोणाचे ?

(A) राधाकृष्णन

(B) श्री अरविंद

(C) टागोर

(D) स्वामी विवेकानंद

52. 'रिपब्लिक' मध्ये खालीलपैकी कोणते कारण 'तत्त्वज्ञांनी शहराचे शासन करावे' यासाठी दिलेले **नाही** ?

(A) ते काव्याचा तिरस्कार करतात

(B) असत्याचा तिरस्कार करतात

(C) त्यांचे प्रेम बदलापेक्षा जे आहे त्याच्यावर असते

(D) ते चटकन शिकतात

53. मूरच्या हेगेलप्रणित चिद्वादाच्या समीक्षेत ज्या मुख्य गृहीतकावर त्याने आक्षेप घेतला ते :

(A) सर्व संबंध हे त्यांच्या संज्ञांच्या आंतरिक असतात.

(B) सर्व संबंध हे त्यांच्या संज्ञांच्या बाह्य असतात.

(C) संबंध आंतरिक व बाह्य असे दोन्ही असतात.

(D) आंतरिक व बाह्य संबंधांमध्ये काही फरक नाही.

54. Ryle's phrase 'the ghost in the machine' was designed to characterize a mythical view, which he attributed to :

(A) Aristotle

(B) Descartes

(C) Strawson

(D) Wittgenstein

55. Carnap upholds :

(A) Correspondence theory of truth

(B) Coherence theory of truth

(C) Pragmatic theory of truth

(D) Semantic theory of truth

56. According to early Wittgenstein a name denotes :

(A) a mental state

(B) a fact

(C) a physical object

(D) a simple

54. "शरीरयंत्रातील भूत" हा राईलचा वाक्प्रचार पुढीलपैकी कोणाचा मिथकात्मक दृष्टिकोन निर्देशित करतो ?

(A) ॲरिस्टॉटल

(B) देकार्त्स

(C) स्ट्रॉसन

(D) विट्गेनस्टाईन

55. कारनॅपने कशाचा पुरस्कार केला ?

(A) सत्यविषयक अन्वय उपपत्ती

(B) सत्यविषयक सुसंवाद उपपत्ती

(C) सत्यविषयक फलप्रामाण्यवादी उपपत्ती

(D) सत्यविषयक अर्थ-उपपत्ती

56. पूर्व विट्गेनस्टाईनच्या मते नाव ..... निर्देशीत करते.

(A) मानसिक अवस्था

(B) तथ्य

(C) भौतिक वस्तू

(D) साधे

57. Russell's theory of descriptions makes a distinction between two forms of a sentences :

(A) Grammatical and Semantical

(B) Grammatical and Logical

(C) Grammatical and Syntactical

(D) Syntactical and Semantical

58. Kierkegaard's notion of truth as subjectivity is related to :

(A) direct communication

(B) rational communication

(C) propositional communication

(D) indirect communication

59. According to Heidegger, the human being belongs to Being as :

(A) a guardian

(B) a creator

(C) a master

(D) an author

57. रसेलची 'वर्णन उपपत्ती' विधानाच्या दोन प्रकारांमध्ये फरक करते :

(A) व्याकरणीय व अर्थात्मक

(B) व्याकरणीय व तार्किक

(C) व्याकरणीय व रचनात्मक

(D) रचनात्मक व अर्थात्मक

58. किर्केगार्डची 'सत्य म्हणजे व्यक्तिसापेक्षता' ही संकल्पना कशाशी संबंधित आहे ?

(A) प्रत्यक्ष संवाद

(B) बौद्धिक संवाद

(C) विधानात्मक संवाद

(D) अप्रत्यक्ष संवाद

59. हायडेगरच्या मतानुसार व्यक्ती ही अस्तित्वाची :

(A) राखणदार असते

(B) निर्माती असते

(C) मालक असते

(D) लेखक असते

60. For Rorty epistemology believes the mind to work on empirical reality to :

(A) mirror it

(B) negate it

(C) transcend it

(D) rationalize it

61. Merleau Ponty does *not* regard the lived-body as a :

(A) physical object

(B) zero point

(C) reflexive touch

(D) incarnate reflection

62. Dewey regards inquiry as a process of constant revision, since it is :

(A) self-assertive

(B) self-negating

(C) self-conscious

(D) self-corrective

60. रॉर्टीच्या मतानुसार ज्ञानमीमांसा असे मानते की मन अनुभवजन्य वास्तवाविषयी विचार करते ते :

(A) त्याचे प्रतिबिंब दाखवण्यासाठी

(B) त्याला नकार देण्यासाठी

(C) त्याच्या अतीत जाण्यासाठी

(D) त्याला तार्किक रूप देण्यासाठी

61. मोर्ले पॉन्टीच्या मतानुसार सजीव शरीर हे पुढीलपैकी काय **नाही** :

(A) भौतिक वस्तू

(B) शून्य बिंदू

(C) प्रतिसादात्मक स्पर्श

(D) देहभूत चिंतन

62. ड्यूईच्या मानण्यानुसार अन्वेक्षण ही पुनर्विलोकनाची सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे, कारण ते :

(A) स्व-अवधारणात्मक आहे

(B) स्व-निषेधक आहे

(C) स्व-जाणीवयुक्त आहे

(D) स्व-सुधारात्मक आहे

63. *Sarvodaya* consists of :

(A) Truth, non-violence and self-assertion

(B) Truth, non-violence and self-denial

(C) Truth, non-violence and self-development

(D) Truth, non-violence and possessiveness

64. Secularism in India does *not* maintain :

(A) the de-publicisation of religions

(B) the de-politicization of religions

(C) a principled distance from religions

(D) the commitment to religious pluralism

65. The constitution is :

(A) not only a noun, but also a verb

(B) either a noun or a verb

(C) neither a noun nor a verb

(D) only a noun, but not a verb

63. **सर्वोदयात** कशाचा अंतर्भाव होतो ?

(A) सत्य, अहिंसा व आत्मनिर्धार

(B) सत्य, अहिंसा व आत्मनकार

(C) सत्य, अहिंसा व आत्मविकास

(D) सत्य, अहिंसा व परिग्रह

64. भारतीय धर्मनिरपेक्षतावाद पुढीलपैकी कशाचा स्वीकार करत **नाही** ?

(A) धर्मांचे नि:सार्वत्रिकीकरण

(B) धर्मांचे नि:राजकीयीकरण

(C) सर्व धर्मांपासून तत्त्वत: अंतर राखणे

(D) धार्मिक अनेकतेशी कटिबद्धता

65. राज्यघटना हे :

(A) केवळ नाम नव्हे, पण क्रियापद आहे

(B) एकतर नाम आहे किंवा क्रियापद आहे

(C) नामही नाही व क्रियापदही नाही

(D) केवळ नाम आहे, क्रियापद नाही

66. Social democracy is a mode of :

(A) government

(B) individual living

(C) institutions

(D) associated living

67. Free and compulsory education is a ..... in India.

(A) fundamental right

(B) social right

(C) political right

(D) cultural right

68. *Sarvodaya* does *not* imply :

(A) the private good

(B) the common good

(C) the dignity of labor

(D) the dignity of work

66. सामाजिक लोकशाही हा कशाचा प्रकार आहे ?

(A) सरकार

(B) वैयक्तिक जीवन

(C) संस्था

(D) सहयोगी जीवन

67. भारतात मुक्त व अनिवार्य शिक्षण हा :

(A) मूलभूत हक्क आहे

(B) सामाजिक हक्क आहे

(C) राजकीय हक्क आहे

(D) सांस्कृतिक हक्क आहे

68. पुढीलपैकी काय सर्वोदयाचा अर्थ **नाही** ?

(A) वैयक्तिक शिव

(B) सामूहिक शिव

(C) श्रमाची प्रतिष्ठा

(D) कामाची प्रतिष्ठा

69. What, according to Kautilya, is most conducive for the stability of the state ?

(A) Establishing peace

(B) Victory in war

(C) Strict governance

(D) Treasury full of resources

70. In Kautilya's policy of governance, which factor is regarded as the strong point of the king ?

(A) Advice of the chaplain

(B) Efficient network of spies

(C) Able Ministry

(D) Active administrative officers

71. According to Locke, State of Nature is a state where there is :

(A) Freedom from the interference of others

(B) Perfect and complete liberty to conduct one's life as one best sees fit

(C) A state without morality

(D) No civil power to whom men can appeal

69. कौटिल्याच्या मतानुसार राज्याच्या स्थैर्यासाठी सर्वात अनुकूल काय आहे ?

(A) शांततेची प्रस्थापना

(B) युद्धातील विजय

(C) कठोर प्रशासन

(D) समृद्ध खजिना

70. कौटिल्यप्रणित प्रशासनाच्या धोरणामध्ये पुढीलपैकी कुठला घटक हे राजाचे बलस्थान मानलेले आहे ?

(A) धर्मगुरुंचा सल्ला

(B) गुप्तहेरांचे कार्यक्षम जाळे

(C) सक्षम मंत्रिमंडळ

(D) क्रियाशील प्रशासकीय अधिकारी

71. लॉकच्या मते, निसर्गावस्था म्हणजे :

(A) स्वातंत्र्य म्हणजे इतरांच्या कार्यात ढवळाढवळ करण्या

(B) स्वत:चे आयुष्य जसे योग्य वाटेल तसे जगण्याचे परिपूर्ण व संपूर्ण स्वातंत्र्य

(C) नीतिमत्ताविरहित शासन

(D) मानवांनी दाद मागावी अशी शासनशक्ती नसणे

72. Berlin associated negative liberty mainly with :

(A) Classical liberal tradition

(B) Communitarianism

(C) Modern liberalism

(D) Communism

73. Which of the following thinkers argues for "a state of affairs in which men are treated as the equal beings which in fact they already are, but are not already treated as being" ?

(A) John Locke

(B) Hobbes

(C) John Rawls

(D) Bernard Williams

74. In Robert Nozick's view which one of the following is *not* among the three main principles that should be accounted for in an adequate theory of Justice ?

(A) A principle of Justice in acquisition

(B) A principle of Justice in transfer

(C) A principle of Justice in rectification

(D) A principle of Justice in decision making

72. बर्लिनने नकारात्मक स्वातंत्र्याची सांगड प्रामुख्याने घातली ती :

(A) अभिजात उदारमतवादी परंपरेशी

(B) कम्यूनिटेरियानिज्म

(C) आधुनिक उदारमतवाद

(D) साम्यवाद

73. खालीलपैकी कोणता विचारवंत असे म्हणतो की "एखाद्या घटनेमध्ये व्यक्तीला समानतेने वागवले जाते, खरेतर व्यक्ती समानच असल्या तरी त्यांना सुरुवातीस असमान वागवले जाते" ?

(A) जॉन लॉक

(B) हॉब्ज

(C) जॉन रॉल्स

(D) बर्नार्ड विल्यम

74. न्यायाच्या पर्याप्त उपपत्ती साठी रॉबर्ट नॉझिक ने सांगितलेल्या प्रमुख तीन तत्त्वांपैकी कोणते **नाहीत** ?

(A) संपादनामध्ये न्यायाचे तत्त्व

(B) हस्तांतरणामध्ये न्यायाचे तत्त्व

(C) परिष्करणामध्ये न्यायाचे तत्त्व

(D) निर्णयामध्ये न्यायाचे तत्त्व

75. For Amartya Sen capabilities as freedom refer to :

(A) Ability to take informed decisions

(B) To be able to do what one wishes and desires to

(C) The presence of valuable options or alternatives effectively available to the agent

(D) Freedom to sell one's produce freely at a desired price

76. Arguing for minority rights Kymlicka distinguishes between which two types of ethnocultural groups ?

(A) National minorities in multination states and Ethnic groups in Polyethnic states.

(B) International minorities in polyethnic states and ethnic groups in multination states.

(C) National minorities in Polyethnic states and Ethnic groups in multination states.

(D) Ethnic groups in multination states only

75. आमर्त्य सेन यांच्या मते स्वातंत्र्याच्या क्षमता ..... निर्देशीत करतात.

(A) माहितीपूर्वक निर्णय घेण्याची क्षमता

(B) वाटेल तसे वागता येण्याची क्षमता

(C) योग्य पर्यायांची उपलब्धता व्यक्तीला असणे

(D) स्वातंत्र्य म्हणजे एखाद्याला त्याचे उत्पादन त्याला उपेक्षित किंमतीला विकता येणे

76. अल्पसंख्यांकांच्या हक्कांबाबत युक्तिवाद करताना किम्लिकांनी कोणत्या दोन संस्कृतिवंशगटांमध्ये भेद केला आहे ?

(A) बहुराष्ट्रीय राज्यातील राष्ट्रीय अल्पसंख्यांक व बहुसांस्कृतिक राज्यातील संस्कृतिवंशगट

(B) बहुसांस्कृतिक राज्यातील आंतरराष्ट्रीय अल्पसंख्यांक व बहुराष्ट्रीय राज्यातील संस्कृतिवंशगट

(C) बहुसंस्कृतिवंशयुक्त राज्यातील राष्ट्रीय अल्पसंख्यांक व बहुराष्ट्रीय राज्यातील संस्कृतिवंशगट

(D) केवळ बहुराष्ट्रीय राज्यातील संस्कृतिवंशगट

77. Michael Sandel's critique of liberalism with reference to rational choice is based on his emphasis upon :

(A) Voluntarily picked up social attachments

(B) Involuntarily picked up social attachments

(C) Impossibility of rational choice altogether

(D) Impossibility of social dialogue among equal partners

78. Who among the following thinkers argues that nature is given to all mankind by God for its common subsistence, one cannot take more than his own fair share ?

(A) John Locke

(B) Hobbes

(C) John Rawls

(D) Rousseau

77. मायकेल सँडलच्या उदारमतवादसमीक्षेसंदर्भात विवेकीनिवडीचा आधार भर देतो तो :

(A) स्वेच्छेने निवडलेल्या सामाजिक

(B) अनैच्छिकरित्या निवडलेल्या सामाजिक

(C) विवेकीनिवडीची अशक्यता

(D) समान जोडीदारांमधील सामाजिक संवादांची अशक्यता

78. 'ईश्वराने समस्त मानवजातीला टिकून राहण्याकरिता निसर्ग बहाल केला आहे; प्रत्येकाने आपल्या रास्त वाट्याखेरीज घेऊ नये' असे प्रतिपादन कोण करतो ?

(A) जॉन लॉक

(B) हॉब्स

(C) जॉन रॉल्स

(D) रूसो

79. Most of the feminist theories suppose that the complex of psychological traits and dispositions that characterize a person as either "masculine" or "feminine" — as well as the relations between genders are :

(A) Genetically formed

(B) Naturally presented

(C) Socially constructed

(D) Determined by oneself

80. Which of the feminist theory emphasizes upon women's financial dependence upon men as the main reason for their subjugation ?

(A) Radical Feminism

(B) Ecofeminism

(C) Liberal Feminism

(D) Socialist Feminism

79. व्यक्तिमत्त्व निर्धारित करणारी मानसिक गुणवैशिष्ट्ये व स्वभाव यांनी मिळून बनणारा समुदाय, बहुतेक स्त्रीवादी उपपत्तींप्रमाणे, 'पुरुषी' किंवा 'स्त्रैण' असे ठरवितो तसेच लिंगभावाधारित नातेसंबंध निर्धारित करतो, ते कसे ?

(A) जनुकाधिष्ठित

(B) निसर्गदत्त

(C) समाजरचित

(D) स्वयंनिर्धारित

80. खालीलपैकी कोणती स्त्रीवादी उपपत्ती स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचे प्रमुख कारण 'स्त्रियांचे पुरुषांवर असणारे आर्थिक अवलंबन' आहे, असे मानते ?

(A) जहाल स्त्रीवाद

(B) पर्यावरणीय स्त्रीवाद

(C) उदारमतवादी स्त्रीवाद

(D) समाजवादी स्त्रीवाद

81. Consider the following statements with reference to valid deductive argument and choose the *incorrect* statement :

(A) All its premises are true and conclusion is also true.

(B) All its premises are true but its conclusion is false.

(C) All its premises are false and its conclusion is also false.

(D) All its premises are false but its conclusion is true.

82. According to quantity, propositions are divided into ..... .

(A) Universal and Particular

(B) Universal and Existential

(C) Affirmative and Negative

(D) Necessary and Probable

83. Example of Law of Excluded Middle is ..... .

(A) A thing cannot be both 'a circle' and 'not a circle'

(B) A circle is a circle

(C) A thing is both a circle and not a circle

(D) A thing is neither a circle nor a not-circle

81. वैध नैगमनिक युक्तिवादाच्या संदर्भात पुढील विधाने तपासा आणि चुकीचे विधान कोणते ते सांगा ?

(A) त्याची सर्व आधारविधाने सत्य आणि निष्कर्ष ही सत्य असेल तर

(B) त्याची सर्व आधारविधाने सत्य आणि निष्कर्ष असत्य असेल तर

(C) त्याची सर्व आधारविधाने असत्य असतील आणि निष्कर्ष ही असत्य असेल तर

(D) त्याची आधारविधाने असत्य असतील आणि निष्कर्ष सत्य असेल तर

82. परिमाण तत्त्वाच्या आधारे विधानांचे वर्गीकरण होते ..... .

(A) सर्ववाची आणि विशेषवाची

(B) सर्ववाची आणि अस्तित्ववाची

(C) होकारार्थी आणि नकारार्थी

(D) अनिवार्य आणि संभाव्य

83. वर्जित मध्यतेच्या नियमाचे उदाहरण आहे ..... .

(A) हे 'वर्तुळ असणे' आणि 'वर्तुळ नसणे' हे दोन्ही असू शकत नाही

(B) वर्तुळ हे वर्तुळ असते

(C) वस्तू ही वर्तुळ असते आणि वर्तुळ नसतेही

(D) वस्तू ही एकतर वर्तुळ नसते किंवा न-वर्तुळही नसते

84. If the Truth-value of 'I' proposition is True (T), the truth-values of 'A' and 'E', 'O' are ..... respectively.

(A) T, F and undetermined

(B) Undetermined, F and F

(C) Undetermined, F and undetermined

(D) F, undetermined and T

85. If the statement 'p' is True, the truth-value of '$p \vee q$' and '$\sim p$' are :

(A) both are true

(B) both are false

(C) '$p \vee q$' is true and '$\sim p$' is false

(D) '$p \vee q$' is false and '$\sim p$' is true

86. Which of the following is the *correct* form of Laws of DeMorgan ?

(A) $\{(p \equiv q) \equiv [(p \supset q) \bullet (q \supset p)]\}$ and $\{[(p \bullet q) \vee (\sim p \bullet \sim q)]\}$

(B) $[(p \bullet q) \equiv (q \bullet p)]$ and $[(p \vee q) \equiv (q \vee p)]$

(C) $[(\sim p \bullet q) \equiv (\sim p \vee \sim q)]$ and $[(\sim p \vee q) \equiv (\sim p \bullet \sim q)]$

(D) $[\sim(p \bullet q) \equiv (\sim p \vee \sim q)]$ and $[\sim(p \vee q) \equiv (\sim p \bullet \sim q)]$

84. जर 'I' विधानाचे सत्यता-मूल्य सत्य (T) असेल तर 'A', 'E' आणि 'O' विधानांचे सत्यतामूल्य अनुक्रमे ..... असेल.

(A) T, F आणि अनिश्चित

(B) अनिश्चित, F आणि F

(C) अनिश्चित, F आणि अनिश्चित

(D) F, अनिश्चित आणि T

85. जर 'p' हे विधान सत्य असेल तर '$p \vee q$' आणि '$\sim p$' चे सत्यतामूल्य हे असेल :

(A) दोन्हीही सत्य

(B) दोन्हीही असत्य

(C) '$p \vee q$' सत्य आणि '$\sim p$' असत्य

(D) '$p \vee q$' असत्य आणि '$\sim p$' सत्य

86. डि मॉर्गनच्या नियमांची **अचूक** मांडणी कोणती आहे ?

(A) $\{(p \equiv q) \equiv [(p \supset q) \bullet (q \supset p)]\}$ आणि $\{[(p \bullet q) \vee (\sim p \bullet \sim q)]\}$

(B) $[(p \bullet q) \equiv (q \bullet p)]$ आणि $[(p \vee q) \equiv (q \vee p)]$

(C) $[(\sim p \bullet q) \equiv (\sim p \vee \sim q)]$ आणि $[(\sim p \vee q) \equiv (\sim p \bullet \sim q)]$

(D) $[\sim(p \bullet q) \equiv (\sim p \vee \sim q)]$ आणि $[\sim(p \vee q) \equiv (\sim p \bullet \sim q)]$

87. Identify the fallacy committed in the following argument :

"The pleasure of an individual is good for him. Therefore the pleasure of everybody is good for everybody."

(A) Division

(B) Composition

(C) Fallacy of Accident

(D) Converse Fallacy of Accident

88. Select the *correct* symbolization of the following proposition :

"Bees and wasps sting if they are either angry or frightened. (Bx, Wx, Sx, Ax, Fx)"

(A) $(x)\{[(Bx \bullet Vx) \bullet (Ax \vee Fx)] \supset Sx\}$

(B) $(x)[(Bx \vee Vx) \bullet (Ax \bullet Fx)] \supset Sx$

(C) $(x)\{(Bx \bullet Vx) \supset [(Ax \bullet Fx) \supset Sx]\}$

(D) $(x)\{(Bx \vee Wx) \supset [(Ax \vee Fx) \supset Sx]\}$

89. Given the argument, select the *correct* option :

Argument :

$(x)\ (Cx \supset Dx)$

$(x)\ (Ex \supset \sim Dx)$

$\therefore\ (x)\ (Ex \supset Cx)$

(A) The argument is true

(B) The argument is false

(C) The argument is valid

(D) The argument is invalid

87. पुढील युक्तिवादातील तर्कदोष :

"व्यक्तीचे सुख तिच्यासाठी चांगले आहे. म्हणून प्रत्येकाचे सुख प्रत्येकासाठी चांगले आहे."

(A) विभाजन तर्कदोष

(B) समूहाभास तर्कदोष

(C) प्रसंगदोष

(D) प्रसंग विपर्यय दोष

88. पुढील विधानाचे **अचूक** चिन्हांकन आहे :

मधमाश्या आणि गांधीलमाश्या जर चिडलेल्या असतील किंवा घाबरलेल्या असतील तर दंश करतात. (Bx, Wx, Sx, Ax, Fx)

(A) $(x)\{[(Bx \bullet Vx) \bullet (Ax \vee Fx)] \supset Sx\}$

(B) $(x)[(Bx \vee Vx) \bullet (Ax \bullet Fx)] \supset Sx$

(C) $(x)\{(Bx \bullet Vx) \supset [(Ax \bullet Fx) \supset Sx]\}$

(D) $(x)\{(Bx \vee Wx) \supset [(Ax \vee Fx) \supset Sx]\}$

89. दिलेल्या युक्तिवादासंबंधी **योग्य** पर्याय निवडा :

युक्तिवाद :

$(x)\ (Cx \supset Dx)$

$(x)\ (Ex \supset \sim Dx)$

$\therefore\ (x)\ (Ex \supset Cx)$

(A) दिलेला युक्तिवाद सत्य आहे

(B) दिलेला युक्तिवाद असत्य आहे

(C) दिलेला युक्तिवाद युक्त आहे

(D) दिलेला युक्तिवाद अयुक्त आहे

90. The Rule of Detachment is :

(A) Rule of Formation only

(B) Rule of Transformation

(C) Rule of Formation and Rule of Transformation

(D) Neither a Rule of Formation nor a Rule of Transformation

91. Which of the following theories represents Ethical holism ?

(A) Anthropocentric morality

(B) Land Ethics

(C) Deep Ecology

(D) Shallow Ecology

92. Indian Ethics do not support any kind of euthanasia on the grounds that :

(A) Life is immaterial and one doesn't have to bother about the type of death.

(B) Any thought of death is sinful.

(C) Life is a divine gift and one gets it as per the result of past Karmas.

(D) Any thought of death is meaningless.

90. निर्योगीकरणाचा नियम हा ..... आहे.

(A) फक्त घडणीचाच नियम

(B) संपरिवर्तनाचा नियम

(C) घडणीचा आणि संपरिवर्तनाचा नियम

(D) घडणीचा ही नियम नाही आणि संपरिवर्तनाचा ही नियम नाही

91. पुढीलपैकी कोणती उपपत्ती नैतिक साकल्यवादाचे प्रतिनिधित्व करते ?

(A) मानवकेंद्री नीती

(B) परिवार नीती

(C) सखोल पर्यावरण नीती

(D) उथळ पर्यावरण नीती

92. भारतीय धर्म कुठल्याही प्रकारच्या सन्मृत्यूला पाठिंबा देत नाहीत कारण त्यांच्या मतानुसार :

(A) जीवन नगण्य आहे व कोणालाही मृत्यूच्या प्रकाराबद्दल चिंता करत बसण्याचे कारण नाही.

(B) मृत्यूबद्दलचा कुठलाही विचार करणे हे पाप आहे.

(C) जीवन ही दैवी देणगी आहे व प्रत्येकाला ती आपापल्या पूर्वकर्मानुसार प्राप्त होत असते.

(D) मृत्यूबद्दलचा कुठलाही विचार करणे निरर्थक आहे.

93. Consequences of technology on human life are studied under :

(A) Metaphysics

(B) Epistemology

(C) Philosophy of technology

(D) Philosophy of art

94. The thesis that, "there is a fundamental ontological distinction between natural things and artifacts" is closely related to ..... .

(A) Ethics

(B) Epistemology

(C) Philosophy of social science

(D) Philosophy of technology

95. Ethical codes prescribed to lawyers is ..... ethics.

(A) Medical

(B) Social

(C) Professional

(D) Utilitarian

96. What is *not* included in the definition of health given by WHO ?

(A) Physical well-being

(B) Mental well-being

(C) Social well-being

(D) Political well-being

93. तंत्रज्ञानाचे मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास म्हणजे :

(A) सद्‌वस्तुशास्त्र

(B) ज्ञानमीमांसा

(C) तंत्रज्ञानाचे तत्त्वज्ञान

(D) कलेचे तत्त्वज्ञान

94. "नैसर्गिक वस्तू आणि कृत्रिम वस्तू यांच्या मध्ये मूलभूत सत्ताशास्त्रीय भेद आहे" हा सिद्धांत ..... च्या संबंधित आहे.

(A) नीतिशास्त्र

(B) ज्ञानमीमांसा

(C) सामाजिक शास्त्रांचे तत्त्वज्ञान

(D) तंत्रज्ञानाचे तत्त्वज्ञान

95. वकिलांसाठी सांगितलेल्या नैतिक आचार संहितेला ..... नीति असे संबोधतात.

(A) वैद्यक

(B) सामाजिक

(C) व्यवसायिक

(D) उपयुक्ततावादी

96. WHOच्या आरोग्याच्या व्याख्येमध्ये कशाचा आंतर्भाव **नाही** ?

(A) शारीरिक स्वास्थ्य

(B) मानसिक स्वास्थ्य

(C) सामाजिक स्वास्थ्य

(D) राजकीय स्वास्थ्य

97. Branch of ethics which deals with the ethical issues with biology and medicine is called :

(A) Philosophy of biology

(B) Philosophy of medicine

(C) Bioethics

(D) Environmental ethics

98. Instrumental and consumerist approach towards environment is called ..... .

(A) Shallow ecology

(B) Deep ecology

(C) Cosmocentric ecology

(D) Green ecology

99. Indian Supreme Court Judgment on 24 September, 2017 upheld right to privacy as ..... .

(A) Freedom of expression

(B) Right to property

(C) Right to employment

(D) Right to life

100. ..... takes into consideration the intrinsic value of the environment.

(A) Shallow ecology

(B) Deep ecology

(C) Anthropocentric view

(D) Utilitarian view

97. जीवशास्त्र आणि वैद्यकशास्त्र यातील प्रश्नांचा विचार करणाऱ्या नीतिशास्त्राच्या शाखेला ..... असे म्हणतात.

(A) जीवशास्त्राचे तत्त्वज्ञान

(B) वैद्यकशास्त्राचे तत्त्वज्ञान

(C) जैवनीतिशास्त्र

(D) पर्यावरणनीतिशास्त्र

98. पर्यावरणाकडे साधनात्मक आणि उपभोगात्मक पद्धतीने बघण्याच्या भूमिकेला ..... म्हणतात.

(A) उथळ पर्यावरणशास्त्र

(B) खोल पर्यावरणशास्त्र

(C) विश्वकेन्द्री पर्यावरणशास्त्र

(D) हरित पर्यावरणशास्त्र

99. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने 24 सप्टेंबर, 2017च्या निर्णयानुसार खाजगीपणाचा अधिकार हा ..... म्हणून मानला आहे.

(A) अभिव्यक्ती स्वातंत्र्य

(B) मालमत्तेचा अधिकार

(C) खाजगीपणाचा अधिकार

(D) जीवन जगण्याचा अधिकार

100. पर्यावरणाचे आंतरिक मूल्य ..... विचारात घेते.

(A) उथळ पर्यावरणशास्त्र

(B) खोल पर्यावरणशास्त्र

(C) मानवकेंद्री दृष्टिकोन

(D) उपयुक्तता दृष्टिकोन

ROUGH WORK